दि. 11/03/2026

**प्रेसनोट**

**पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाच्या नांदेड व लातूरमध्ये धाडी**

# नांदेड शहरातील विमानतळ व लातूर जिल्हयातील देवणी भागात मटका अड्डयांवर छापे, 94 हजार रुपयांच्या रोख रकमेसह अडीच लाखांचा मुद्देमाल हस्तगत

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी नांदेड शहरात व लातूर जिल्हयात पोलीस पथकाची रवानगी केली होती.

सदर पथकाने, दिनांक 11/03/2026 रोजी, नांदेड शहरातील विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत आनंदनगर चौकातील ठाकरे कॉम्लेक्स व सांगवीतील हातोडा चौक या दोन ठिकाणी शटरमध्ये चालू असलेल्या मटका बुकीवर कारवाई करत, 69,460/- रुपयांची रोकड व 72 हजार रुपयांचे (07) मोबाईल जप्त केले असून, नमूद प्रकरणात एकूण (20) आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द विमानतळ पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात येत आहे.

तत्पूर्वी, दिनांक 10/03/2026 रोजी सायंकाळी लातूर जिल्ह्यातील देवणी येथील बस स्थानकसमोरील डोंगरे कॉम्प्लेक्स, मिनी मार्केट व बोरोळ चौक या ठिकाणांवरील ऑनलाईन लॉटरी मटका बुकीवर कारवाई करत, 25,300/-रुपयांची रोकड, 45 हजार रुपयांचे (09) मोबाईल व व 61,700/- रुपयांचे लॉटरीचे साहित्य जप्त केले असून, नमूद प्रकरणात एकूण (13) आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द देवणी पोलीस ठाणे येथे गुरनं 56/2026 कलम 12 (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदवून, त्याचा तपास देवणी पोलीस ठाण्यातील पोहेकॉ/ शौकत सय्यद यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

उपरोक्त दोन्ही कारवायांत, पोलीस पथकाने एकूण 94,760/- रुपयांची रोकड, (16) मोबाईल व साहित्य असा एकूण 2,73,420/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपीतांविरुद्ध वरीलप्रमाणे गुन्हे नोंद केले आहेत.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/संजीव जिंकलवाड, पोकॉ/ गणेश धुमाळ व पोकॉ/ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर किंवा 91 50 100 100 या ‘खबर’ हेल्पलाइनवर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड